# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (क्रीडा व सांस्कृतिक विभाग)

क्री. व सां. वि. /७२ दि. २७/०७/२०१६

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका
........................................ प्राथमिक/उच्च प्राथमिक /माध्यमिक विद्यालय.

विषय :– "महापौर चषक" वंदेमातरम् समूहगान स्पर्धा – २०१६–२०१७.

नागपूर महानगरपालिका तर्फे दि. ०९ ऑगष्ट ते १४ ऑगष्ट २०१६ पर्यंत म.न.पा. प्राथमिक/उच्च प्राथमिक/माध्यमिक शाळा तसेच सर्व खाजगी/प्राथमिक/उच्च प्राथमिक/माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांकरीता "महापौर चषक" वंदेमातरम् समूहगान स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

स्पर्धा या गटानुसार राहतील. – १) गट क्रमांक – १ – वर्ग ९ ते १०
– २) गट क्रमांक – २ – वर्ग ६ ते ८
– ३) गट क्रमांक – ३ – वर्ग १ ते ५

स्पर्धेचे नियम :–

१) प्रवेश नि:शुल्क राहिल.

२) सर्व गटातील स्पर्धकांना वंदेमातरम् पूर्ण गीत सादर करणे अनिवार्य राहिल. त्यासोबत कोणतेही एक देश भक्तिपर गीत असे दोन गीते सादर करावे लागेल.

३) प्राथमिक फेरीद्वारे उत्कृष्ट चार शाळांची निवड अंतिम फेरीसाठी करण्यात येईल. त्यामध्ये म.न.पा. ची एक शाळा अंतिम फेरीकरीता पात्र राहिल.

४) गीत सादर करणारे विद्यार्थी परिपत्रकातील गटानुसार वर्गातील असावे. यानुसार न आढळल्यास किंवा इतर सहभागी शाळांनी आक्षेप घेतल्यास त्वरीत त्याबाबत पुरावा सादर करावा लागेल. अन्यथा त्या शाळेला स्पर्धेतून बाद करण्यात येईल, व संबंधित मुख्याध्यापकास जबाबदार धरण्यात येईल.

५) स्पर्धेत एकूण १० ते १५ विद्यार्थीसह वाद्यवृंदाचा समावेश राहिल. वाद्यवृंद संघात हार्मोनियम व तबला त्यासोबत ढोलकी, ढोलक, बॅन्ड, साईड ड्रम, झांज, घुंगरू, मिराकस, डफ ही वाद्ये वापरता येतील.

६) प्रत्येक गटाकरीता वेगळया विद्यार्थ्यांची निवड करावी. तसेच वाद्यवृंद संघात विद्यार्थ्यांचा समावेश असल्यास प्राधान्य देण्यात येईल. शालेय गणवेशातच गीत सादर करणे अनिवार्य राहिल.

७) स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या शाळांनी आपले प्रवेशपत्र दि. ६ ऑगष्ट २०१६ पर्यंत क्रीडा व सांस्कृतिक विभाग म.न.पा. केंद्रीय कार्यालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे कार्यलयीन वेळेत सादर करावे. प्रत्येक गटाकरीता वेगळे प्रवेशपत्र सादर करावे.

८) अंतिम स्पर्धा १४ ऑगष्ट ला होईल. स्पर्धेचे स्थळ खालील दिलेल्या प्रमाणे आहे.

९) सहभागी सर्व शाळांनी स्पर्धास्थळी अर्धा तास अगोदर उपस्थित असल्याची नोंद करावी लागेल.

१०) यानंतर येणाऱ्या शाळांची नोंद घेण्यात येणार नाही. याबाबतची खबरदारी संबंधित शिक्षकांनी घ्यावी.

११) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहिल.

**पुरस्कार** :— (सर्व गटातील विजेत्याकरीता)

प्रथम क्रमांक :— रू. १०,०००/— रोख महापौर चषक विद्यार्थ्यांना वैयक्तिक बक्षिसे
द्वितियं क्रमांक :— रू. ७,०००/— रोख ----------------------//-----------------------
तृतिय क्रमांक :— रू. ५,०००/— रोख ----------------------//-----------------------
चतुर्थ क्रमांक :— रू. ३,०००/— रोख ----------------------//-----------------------

म.न.पा. शाळा उत्तेजनार्थ

विशेष पुरस्कार :— रू. ३,०००/— रोख ----------------------//-----------------------
(अंध/विकलांग/मतिमंद शाळांकरीता) रोख पुरस्कार धनादेश द्वारे देण्यात येईल.

**प्राथमिक फेरी वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| गट क्रमांक — १ — वर्ग ९ ते १० | दि. ९ ऑगष्ट २०१६ | सकाळी ९.३० वा. |
| गट क्रमांक — २ — वर्ग ६ ते ८ | दि. १० ऑगष्ट २०१६ | ---------//---------- |
| गट क्रमांक — ३ — वर्ग १ ते ५ | दि. ११ ऑगष्ट २०१६ | ---------//---------- |

**स्थळ** :— **विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकूल, तिसरा माळा, झांसी राणी चौक, सिताबर्डी, नागपूर — १२.**

प्राथमिक स्पर्धेतून निवड झालेल्या शाळांची अंतिम स्पर्धा दि. १४ ऑगष्ट २०१६ रोजी रविवारला सकाळी १०.०० वा. सुरू होईल. बक्षिस समारंभ दुपारी १ वाजता होईल.

**अंतिम स्पर्धा स्थळ** :— **विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकूल, चौथा माळा, झांसी राणी चौक, सिताबर्डी, नागपूर — १२.**

**टिप** :— संघ प्रवेशाबाबत त्वरीत कळवावे. अधिक माहितीकरीता श्री. विजय ईमाने तसेच श्री. जितेन्द्र गायकवाड, क्रिडा व सांस्कृतिक विभाग, म.न.पा. केंद्रीय कार्यालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांचेशी संपर्क साधावा.
मो. नं. ९८२२५०१०१९/९१५८९९९६४८/९१५८९११९८४

शिक्षणाधिकारी तथा
क्रीडा व सांस्कृतिक अधिकारी
महानगरपालिका, नागपूर

क्रीडा निरिक्षक
महानगरपालिका, नागपूर